# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 22.07.2024** **वार – सोमवार**

---

**मोफत शस्त्रक्रिया**

शून्य ते 18 वयोगटातील सर्व बालकांवरील मोठया स्वरूपाच्या उपचारांसाठी केंद्र आणि राज्य शासनाचा राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. याअंतर्गत राज्य कुटुंब कल्याण कार्यालयानं पुणे आणि पिंपरी चिंचवड मधल्या काही खासगी रूग्णालयांशी करार केला आहे. या करारानुसार बालकांचे जन्मजात हृदयरोग, अस्थिरोग शस्त्रक्रिया, प्लास्टीक सर्जरी, मेंदूची शस्त्रक्रिया, दातांची शल्यचिकित्सा, कान आणि डोक्याचे उपचार मोफत होणार आहेत.

**नियुक्ती**

लोकसभा निवडणुकीपूर्वी पुणे महापालिकेतून बदली झालेल्या अधिकारी चेतना केरुरे आणि आशा राऊत यांना पुन्हा एकदा पुणे महापालिकेच्या उपायुक्त पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. राज्य सरकारनं याबाबतचे आदेश जारी केले आहेत. तीन वर्षाचा कालावधी पूर्ण होण्याआधीच बदली केल्याबद्दल राऊत आणि केरुरे यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे धाव घेतली होती.

**दंड**

गेल्या सहा वर्षांत पुणे महापालिकेने विनापरवानगी रस्ते खोदाई प्रकरणी 4 कोटी 81 लाख रुपये दंड आकारला आहे. पुणे शहरात रस्ते खोदाईची कामं करण्यासाठी 30 एप्रिलपर्यंत परवानगी होती. त्यानंतर पावसाळ्यात विनापरवानगी रस्ते खोदल्यास महापालिका तीनपट दंड आकारत आहे.

**व्यासपूजा**

शोधक वृत्तीनं आपण स्वतःसोबत राहून स्वतःचा शोध घ्यायला शिकलं पाहिजे, असं प्रतिपादन आंतरराष्ट्रीय कीर्तीचे योगगुरु डॉ संप्रसाद विनोद यांनी केलं. महर्षि विनोद रिसर्च फौंडेशनच्या वतीनं काल पुण्यात 81व्या व्यासपूजा महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपस्थित योगसाधकांना त्यांनी संकल्प समाधी आणि निर्विकल्प समाधीचा अनुभव दिला.

**पीकविमा पाठशाळा**

प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत पुण्यात शेतक-यांसाठी पीक विमा पाठशाळा आयोजित करण्यात आली होती. जास्तीत जास्त शेतक-यांनी एक रूपयात पीक विमा काढावा, पिकांचं नुकसान झाल्यास शेतकऱ्यांनी खचून न जाता पुन्हा शेती करण्यासाठी सज्ज व्हावं, असं पिक विमा कंपनीचे राज्य व्यवस्थापक आझाद मिश्रा यांनी यावेळी सांगितलं.

**डेंग्यू**

शहराला डेंग्यू मुक्त करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने डेंग्यू मुक्त शहर मोहीम राबविण्यात येत आहे. त्यानुसार नागरिकांनी आठवड्यातून एक दिवस, एक तास आपल्या राहत्या घरी स्वच्छता करायची आहे. पालिका आयुक्त शेखर सिंह यांनी स्वतःच्या निवासस्थानाची स्वच्छता करत या मोहिमेत सहभाग घेतला.

**मनोरमा खेडकर**

वादग्रस्त प्रशासकीय अधिकारी पूजा खेडकर यांच्या आई मनोरमा खेडकर यांना 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. पिस्तुलाचा धाक दाखवून शेतकऱ्यांना धमकवल्याप्रकरणी मनोरमा खेडकर अटकेत आहेत.

**गोळीबार**

नवले पूल परिसरात काल रात्री चोरट्यांनी पोलिसांच्या अंगावर मोटार घालण्याचा प्रयत्न केला. तेव्हा प्रसंगावधान राखून पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ चोरट्यांच्या दिशेने गोळीबार केला. या घटनेत कोणी जखमी झाले नसून या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**गुन्हा**

अनेक पर्यटन स्थळांवर, पर्यटकांवर विविध प्रकारचे निर्बंध लावण्यात आले असतानाही, या निर्बंधांकडं दुर्लक्ष करून त्या परिसरात फिरणाऱ्या 50 जणांविरुद्ध पुणे ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. लोणावळा परिसरातील अनेक धबधबे आणि डोंगरकडे सध्या धोकादायक बनले असून दाट धुक्यामुळं शेजारील दरीचा अंदाज येत नाही. अज्ञात ठिकाणांच्या धबधब्यांकडे जाणाऱ्या पाऊलवाटा  निसरडया झाल्या आहेत. अशा काही पर्यटन स्थळावर जिल्हा प्रशासनानं पर्यटकांसाठी निर्बंध जारी केले आहेत. या निर्बंधांचं पालन न करणाऱ्या पर्यटकांविरुद्ध स्थानिक पोलिसांनी कारवाई सुरु केली आहे.

**लोहगाव**

पुण्याच्या लोहगाव विमानतळावरील नवीन टर्मिनलच्या आवारात रिक्षा, टॅक्सी किंवा खासगी कॅबला अजूनही परवानगी नसल्यानं प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. दरम्यान नवीन टर्मिनलपासून पार्किंग मॉलपर्यंत प्रवाशांसाठी दोन स्वतंत्र वातानुकूलित बस गाड्यांची व्यवस्था करण्यात आली असल्यानं, या टर्मिनलमध्ये खासगी रिक्षा आणि कॅब ला परवानगी देण्यात आली नसल्याचा खुलासा विमानतळ प्रशासनानं केला आहे.

**पाऊस**

हवामान विभागानं वर्तवलेल्या अंदाजानुसार पुणे जिल्ह्याच्या घाटमाथ्यावर आणि धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर कायम आहे. या पावसामुळे खडकवासला धरण साखळीत आज सकाळी सहा वाजेपर्यंत 50 % म्हणजे 14 पूर्णांक 53  टीएमसी इतका पाणीसाठा झाला आहे. दरम्यान खरिपाच्या आवर्तनासाठी नवीन मुठा उजव्या कालव्यातून काल संध्याकाळपासून पाणी सोडण्यात येत आहे, असं खडकवासला पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता श्वेता कुऱ्हाडे यांनी सांगितलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद झाली. उद्या ढगाळ हवामानासह पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**